Laptop Purchese 2024

# सातारा जिल्हा परिषद, सातारा

## सामान्य प्रशासन विभाग

**कार्यालय पत्ता : सातारा-कोरेगांव रोड,सदर बझार कॅम्प,सातारा ४१५००१**

कार्यालय दूरध्वनी क्र. : (02162) 295053 e-mail -dyceogadstr@gmail.com

जाक्र. — साप्रवि/ITCell/Laptop/ 625 /2025 दिनांक- 25 / 02 / 2025

**जाहिर दरपत्रक निविदा**

**प्रति,**

--------------------------------------

--------------------------------------

विषय- लॅपटॉप खरेदी करण्यासाठी स्थानिक पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेबाबत..

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचे कार्यालयीन वापरासाठी खाली दिलेल्या स्पेसिफिकेशननुसार लॅपटॉप पुरवठा करण्यासाठी स्थानिक पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**लॅपटॉप स्पेसिफिकेशन**

| अक्र | लॅपटॉप स्पेसिफिकेशन | संख्या | अंदाजित किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | Apple MacBook Air 13, M3 Chip,8 Core, 512 GB SSD Memory 16 GB, Intel 16GB, Display size 13",Touch Display, 3.5mm Headphone jack, WiFi-6E, Bluetooth 5.3, 1080p Face Time HD Camera, Four Speaker Sound System, Keypad,Warranty 1 Year | 1 | 1,30,000/- | - |

सेवा पुरवठादार यांनी खालीलप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रके विहित मुदतीत या कार्यालयास सादर करण्याची आहे.

1. वरील प्रमाणे लॅपटॉप संच सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा (आयटी सेल) येथे पोहोच करुन कार्यान्वित करुन देणेची जबाबदारी पुरवठादाराची राहिल.
2. पुरवठादाराने वर नमूद केलेल्या स्पेसिफिकेशननुसार लॅपटॉपचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.
3. लॅपटॉपचा वॉरंटी कालावधीत लॅपटॉपमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची दुरुस्ती विनामूल्य करण्याची आहे. त्यासाठी अतिरिक्त रक्कम आदा केली जाणार नाही.
4. लॅपटॉपमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची दुरुस्ती 48 तासात करुन देणे बंधनकारक आहे.
5. पुरवठादाराने दरपत्रकासोबत पॅन कार्ड, GSTN प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
6. पुरवठादाराने दरपत्रकासोबत संस्थेचा पत्ता,दूरध्वनी क्रमांक, ई-मेल देण्यात यावा.
7. पुरवठादाराचे देयकातून शासन प्रचलित नियमानुसार GST व Income Tax देय रकमेतून कपात करण्यात येईल.
8. अपूर्ण माहिती, कागदपत्रे असणारे दरपत्रक नाकारण्यात येईल.
9. दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार या कार्यालयाने राखून ठेवण्यात आलेले आहेत. सबब याबाबत कोणत्याही सेवा पुरवठादारास हक्क सांगता येणार नाही.
10. दरपत्रके सादर करताना दरपत्रक सिलबंद लखोट्यामध्ये देण्याचे आहे. सदर लखोट्यावर **"गोपनिय-दरपत्रक, कामाचे नांव-लॅपटॉप दरपत्रक"** असे नमूद करावे.

11. विहित नमुन्यातील दरपत्रके **मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी** (साप्र), **चौथा मजला, जिल्हा परिषद सातारा, सातारा-कोरेगांव रोड, सातारा यांचे नावे दिनांक**- 07 / 03 / 2025 **रोजी सायं**.5.00 **वाजेपर्यंत** या कार्यालयास पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. विहित मुदतीत प्राप्त न होणाऱ्या दरपत्रकावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेण्यात येणार नाही.
12. पुरवठा आदेश देण्यापूर्वी L1 पुरवठादारा यांनी दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या रकमेच्या 3% सुरक्षा ठेव म्हणून येणारी रक्कम चलनाने भरणा करावी अथवा सदर रकमेची बँक गॅरंटी या कार्यालयामध्ये जमा करण्यात यावी.
13. अधिक माहिती व संपर्कासाठी – सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद सातारा – दूरध्वनी क्र.02162-295053 Email- dyceogadstr@gmail.com

(निलेश घुले)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी** (साप्र),
**सातारा जिल्हा परिषद,सातारा.**

प्रत- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत- मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत- जिल्हा परिषद नोटीसबोर्डवर प्रसिध्द करणे